**दिनांक : 09 - 09-2026**

**"संस्थे च्या वार्षिक सर्वसाधारण सभे चा अहवाल"**

सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थे ची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३० - ०८ - २०२६ रोजी मुनोत सभागृहात घेण्यात आली. ह्या सभेत एकूण ५८ सभासद / सह - सभासद उपस्थित होते.

सर्व प्रथम संस्थेचे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रम पत्रिके प्रमाणे सभेच्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यास चिटणीसाना सांगितले.

विषय क्रमांक १ -

गत वर्षात मयत झालेल्या सभासद / सभासदांचे कुटुंबीय यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विषय क्रमांक २ -

वर्ष २०२४ - २५ च्या वार्षिक सर्व साधारण सभे चा अहवाल एकमतानं मंजूर करण्यात आला.

विषय क्रमांक ३ -

आर्थिक वर्ष २०२४ - २५ चा वार्षिक अहवाल, जमा नावे पत्रक आणि ताळेबंद यांना एक मुखाने मंजुरी देण्यात आली.

विषय क्रमांक ४ -

आर्थिक वर्ष २०२६ - २७ साठी अंतर्गत लेखा परीक्षक म्हणून श्री आर. ए. करंदीकर यांची तर वैधानिक लेखा परीक्षक म्हणून श्री सचित चव्हाण यांची नेमणूक एकमताने करण्यात आली.

विषय क्रमांक ५ -

संस्थेत सध्या वापरात नसलेला जो डेड स्टॉक आहे त्याला निर्गमित करण्याचे तसेच संस्थे चा संगणक, प्रिंटर, ऑफिस टेबल आणि ४ लोखंडी कपाटे, विकासक आपल्या ऑफिस साठी जी जागा देईल तिथे, ठेवण्याचे सर्वांच्या संमती ने ठरविण्यात आले.

विषय क्रमांक ६ -

संस्थे च्या पुनर्निर्माण प्रकल्पात आर्थिक वर्षात होणाऱ्या खर्चा साठी ५ लाख रुपयांची तरतूद सभासदांच्या मंजुरी ने करण्यात आली.

विषय क्रमांक ७ -

आयता वेळ चे प्रश्न -

सभासदान कडून कुठले ही प्रश्न न आल्याने सचिवांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून वार्षिक सर्व साधारण सभा संपल्याचे जाहीर केले.

विनायक पटवर्धन

सचिव